स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक 08–07–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 5. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 6. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 7. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 8. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 9. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 10. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 11. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 12. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 2. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 82</u> :— महाराष्ट महानगरपालिका अधिनियमाचे कलम 140(अ) नुसार मुदतीच्या आंत मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सामान्य करात खालील प्रमाणे सुट देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1) पहिल्या सहामाहीची ( 1 एप्रिल ते 30 सप्टेंबर) रक्कम 31 मे पावेतो भरल्यास पहिल्या सहामाहीच्या सर्वसाधारण करात 2 टक्के इतकी सुट, तसेच 31 मे पावेतो संपूर्ण वर्षाचा ( 1 एप्रिल ते 31 मार्च ) कर पटविल्यास संपूर्ण वर्षाच्या सर्वसाधारण करात 4 टक्के इतकी सूट त्याच प्रमाणे दुसऱ्या सहामाहीची (1 आक्टोंबर ते 31 मार्च) रक्कम 30 नोव्हेंबर पर्यंत भरल्यास दुसऱ्या सहामाहीच्या सर्वसाधारण करात 2 टक्के सूट देणे.

2) केवळ चालू आर्थिक वर्ष 2013 —2014 करीता मालमत्ता करावर सुट :—

चालू आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता धारकांना देयक तामील केल्याच्या तारखुपासुन 1 महिन्याचे आंत त्यांनी कराचा भरणा केल्यास.

अ) पहिल्या सहामाही कराची ( 1 एप्रिल ते 30 सप्टेंबर) रक्कम भरल्यास सामान्य करात 2 टक्के सुट.

ब) संपूर्ण आर्थिक वर्षाचा (दोन्ही सहामाहीचा 1 एप्रिल ते 31 मार्च ) कर भरल्यास सामान्य करात 4 टक्के सुट.

क) अपुर्ण कराचा भरणा केल्यास कुठल्याही प्रकारची सुट न देणे.

ड) दुसऱ्या सहामाहीची ( 01 ऑक्टोबर ते 31 मार्च ) रक्कम 30 नोव्हेंबर पर्यंत भरल्यास दुसऱ्या सहामाहीच्या सर्व साधारण करात 2 टक्के सुट.

<u>ठराव क्रमांक 83</u> :— नागपूर शहरातील मंजुर विकास योजनेतील मौजा— पारडी, ख. क्र. 87/1—3, 84,87 (भाग) मधील श्रीमती सरस्वतीबाई पांडुरंगजी तलमले तर्फे प्रायमार्क इंजिनिअर्स, यांच्या मालकीच्या जागेपैकी दफन भुमी/स्मशनभुमी करीता आरक्षित (आरक्षण क्र.ई—6) 25010.00 चौ.मी.(6.18एकर) जागा, 30.00 रुंद रस्त्याचे आरक्षणा खालील 6880.00 चौ.मी..(1.70एकर) जागा व 18.00 मी रुंद रस्त्याचे आरक्षणा खालील 4490.00 चौ. मी..(1.11एकर) जागा अशा एकुण 36380.00 चौ.मी.(8.99 एकर) जागेचे संपादन करण्यास्तव स्थायी समिती ठराव क्र. 14 मधील निर्देशांनुसार कायदयाचे सल्लागार यांनी जमिनमालकाने टी.डी.आर. चे स्वरुपात जमिनीचा मोबदला स्विकारण्यास नकार दिल्याने व उपरोक्त आरक्षणांच्या जागांचे भुसंपादन आवश्यक असल्याने निहित कालावधीत भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत अभिमत दिलेले असल्याने उपरोक्त जागेचे संपादन करण्यास्तव आवश्यक रु. 12,28,00,000/— च्या राशीची तरतुद उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित आरक्षणांच्या जागेचे भुसंपादन निहित कालावधीत जिल्हाधिकारी मार्फत नियमाप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करावी तसेच प्रस्तावित प्रकरणाची नोंद घेण्यास उपरोक्त प्रकरण म.न.पा. संभागृहा कडे पाठवावे यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 84</u> :— नायक प्राथमिक शाळा म.न.पा., नागपूर गांधीबाग झोन हंसापूरी नागपूर ही म.न.पा. च्या मालकीची शाळा बंद आहे. या शाळेच्या इमारती मध्ये शिवाजी नाईट हायस्कूल या रात्र पाळीतील शाळेला 4 वर्गखोल्या किरायाने दिलेल्या आहेत. दिवसपाळीमध्ये हया वर्गखोल्या रिकाम्या असतात. सदर चार वर्गखोल्या दिवसपाळीमध्ये निराला विद्यालय हंसापूरी नागपूर यांना 72686 रु. मासिक किरायाने देण्याचे मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन आयुक्तांची मंजूरी घेऊन परत स्थायी समिती समोर विषय सादर करावा. यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 85</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर